खे.ता.शि.प्र.मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

## राज्यशास्त्र विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३

## वार्षिक अहवाल

महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रथम वर्ष कला या वर्गात एकूण १०२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. द्वितीय वर्षामध्ये एकूण २३ विद्यार्थ्यांनी विशेष स्तर म्हणून राज्यशास्त्र या विषयाची निवड केली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाविद्यालयांमध्ये अत्यंत उत्साहात २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला या दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये रांगोळी स्पर्धा,चित्रकला स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, वाद विवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले तसेच संविधाना प्रती जनजागृती करण्यासाठी पथनाट्य देखील आयोजित करण्यात आले. डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन देखील महाविद्यालयामध्ये करण्यात आले. राज्यशास्त्र विभागा अंतर्गत प्रथम वर्ष कला वाणिज्य विज्ञान या तीनही शाखांमधील विद्यार्थ्यांसाठी लोकशाही, निवडणूक आणि प्रशासन DEG या विषयाचे अंतर्गत मूल्यांकन यशस्वीपणे पार पाडण्यात आले.

अशाप्रकारे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष स्तरावर प्रयत्न करण्यात आले.